# कार्य अहवाल

## 2016 - 2023



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी



# डॉ.प्रशांत भिमराव पाटील

• तालुकाध्यक्ष – राष्ट्रवादी युवक काँग्रेस, जामनेर •

•संचालक – सिद्धिविनायक हॉस्पिटल, जामनेर• | • संस्थापक – ब्रिथ फ्री फाउंडेशन•

जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा ध्यास

# परिचय

- नाव – डॉ. प्रशांत भिमराव पाटील
- व्यवसाय – सिद्धिविनायक हॉस्पिटलचे मालक व संचालक
- जन्मदिनांक – जून, १९८१
- जन्मस्थळ – टाकळी, जामनेर
- वय – ४१ वर्ष
- शिक्षण – बी.ए.एम.एस.
- विवाह स्थिती – वैवाहिक
- जात – लेवा पाटील
- धर्म – हिंदू

## सामाजिक, राजकीय पदे व संस्था

- तालुकाध्यक्ष – राष्ट्रवादी काँग्रेस डॉक्टर सेल, जामनेर (२०१६ ते २०२०)
- जिल्हा उपाध्यक्ष – राष्ट्रवादी युवक काँग्रेस, जळगाव (२०२० ते २०२१)
- तालुकाध्यक्ष – राष्ट्रवादी युवक काँग्रेस, जामनेर (२०२१ ते आजतागायत)
- संस्थापक – ब्रिथ फ्री फाउंडेशन (स्थापना – २०१६)
- संचालक व मालक – सिद्धीविनायक हॉस्पिटल (स्थापना – २००८)



जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा ध्यास

# मनोगत

सप्रेम नमस्कार,

राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक आणि महाराष्ट्राचेच नव्हे तर देशाचे आधारवड माननीय शरदचंद्रजी पवार साहेबांच्या सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय कार्यामध्ये; वैयक्तिक आयुष्यात येणाऱ्या आव्हानांना, अडचणींना व सुख-दु:खांना सामोरे जाण्याच्या त्यांच्या गुणवैशिष्ट्य, स्वभावशैली व कार्यपद्धतीला प्रेरित होऊन माझ्या कारकिर्दीला सुरुवात झाली. माझे कुटुंब मुळातच काँग्रेसी विचारांचे असल्याने त्या विचारांचा पगडा हा बालपणापासूनच माझ्या मनावर खोलवर रुजला गेला. त्यामुळे मी अगदी सहजपणे राष्ट्रवादीकडे आकर्षित झालो.राजकारणात येण्याआधीच समाजाप्रती असलेल्या आपल्या कर्तव्याच्या भावनेतून मी वैयक्तिक पातळीवर अनेक महत्वाकांक्षी उपक्रम राबवले. आजही समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी अनेक लोकपयोगी कामांच्या माध्यमातून मी सदैव अग्रेसर राहण्याचा प्रयत्न करत आहे.

परिवर्तन घडू शकते पण त्यासाठी तितक्याच ताकदीचे प्रयत्न करायला हवे असे माझे मत आहे. महापुरुषांच्या विचारांचा पगडा, सामाजिक संदर्भातील भरपूर वाचन यामुळे समाजसेवेची माझी भावना ही तीव्र होत गेली. अनेक मित्र, सहकारी आणि आप्तेष्टांच्या माध्यमातून अनेक सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम, चळवळींचा मी भाग बनत गेलो. त्यातूनच हळूहळू राजकारणाकडे माझी वाटचाल सुरु झाली आणि मी अधिकृतरित्या जामनेर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा सदस्य झालो. आदरणीय पवार साहेब व अनेक नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली गेली ६ वर्ष राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासोबत जामनेर तालुका व इतरत्र काम करत असतांना मला अनेक संधी मिळत गेल्या. त्यामुळेच मी अविरतपणे समाजाच्या उन्नत्तीसाठी शेती, आरोग्य, रोजगार, पायाभूत सुविधा, शिक्षण अशा अनेक क्षेत्रातील परिवर्तनीय, परिणामकारक कामांसाठी, प्रश्नांसाठी प्रयत्न करु शकलो. पेशाने डॉक्टर जरी असलो तरी त्यापलीकडे जाऊन माझ्याकडे असलेल्या राजकीय जबाबदारीचा भार सांभाळत विविध माध्यमातून जनतेचे सामाजिक, आर्थिक प्रश्न सोडविण्याचा पूर्ण प्रयत्न माझ्या क्षमतेनुसार मी पक्षाच्या मदतीने करत राहतो.



**जामनेरचा सर्वांगीण विकास हाच आमचा ध्यास**

# ध्येय व उद्दिष्टे

जामनेर विधानसभा मतदारसंघात आरोग्य, शिक्षण, शेती, रोजगार यांसारख्या अतिशय महत्वपूर्ण बाबीसंदर्भातील समस्या वा सुविधांचा अभाव मुळापासून नष्ट करून परिपूर्ण संधी व सुविधा प्राप्त होण्यासाठी कृतीशीलपणे कार्यरत राहणे हा माझा प्राथमिक उद्देश आहे. सार्वजनिक आरोग्य सुविधा सुधारणे, सर्व क्षेत्रातील दर्जेदार शिक्षणाच्या संधींचा जामनेरकरांना तसेच इतर सर्व होतकरू विद्यार्थ्यांना लाभ व्हावा हा माझा प्रयत्न आहे. रोजगाराभिमुख, व्यवसायाभिमुख  शिक्षण सुविधांचा वापर केला तर साहाजिकच रोजगाराच्या संदर्भातील बरेचसे प्रश्न सुटतील असे मला वाटते.

आजची वाढलेली लोकसंख्या बघता रोजगाराची कमतरता हा सर्वात गंभीर प्रश्न बनला आहे. भविष्यात तर हा प्रश्न अधिक जटिल होत जाणार आहे. त्यामुळेच वाढत्या बेरोजगारीवर उपाय म्हणून युवांना सृजनशील व्यवसाय निर्मितीवर भर, मार्गदर्शन, प्रोत्साहन व आर्थिक सहाय्य मिळवून देण्याचा माझा कयास आहे. शेती हा जामनेर वासियांचा उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत मानला जातो. पण सततची नापिकी, दुष्काळग्रस्त परिस्थिती, अयोग्य हमीभाव, नैसर्गिक आपत्ती, शेतकरी आत्महत्या यांसारख्या अनेक समस्यांमुळे सर्वच शेतकरी हवालदिल झाले आहे. म्हणूनच जगाच्या या पोशिंद्यासाठी फायद्याची विकासकामे करणे व त्यांना सर्व सुविधांचा तात्काळ लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असणे हे मी माझे प्रमुख कर्तव्य व जबाबदारी मानतो.



**जामनेरचा सर्वांगीण विकास**
**हाच आमचा घ्यास**

‘वाढती महागाई व घटते उत्पन्न’ याची झळ ही सामान्य लोकांना तीव्रतेने बसत आहे. एकतर महागाई कमी करावी किंवा उत्पन्न तरी वाढावे यासाठी सर्वतोपरी ताकदीने आवाज उठवेल व सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी कृतीशील असेल. महिला सुरक्षा हा समाजात नेहेमीच चर्चेचा विषय ठरत असतो. आज कुठलीही स्त्री मग ती आपली आई असेल, बायको, बहिण वा मैत्रीण आपल्या स्वतःच्या घरात, परिसरात, गावात किंवा शहरात स्वतःला सुरक्षित मानत नाही यामागे कारण आहे ती समाजात वाढत चाललेली विकृती. या विकृतींचा नायनाट करण्यासाठी व महिलांना घराबाहेर पडून नवीन कामांना प्रोत्साहन व सुरक्षित वातावरण निर्माण करून देण्याची जबाबदारी आपल्या सर्वांवरचं आहे. माझ्या प्रयत्नातून व आपल्या साथीने हे कार्य यशस्वी करण्याची मी महत्वाकांक्षा बाळगतो. थोडक्यात माझ्या जन्मभूमीला म्हणजेच आपल्या जामनेर तालुक्याला सर्वेतोपरी विकसित आणि सक्षम बनवणे हाच माझा अजेंडा आहे. सर्व मुलभूत व पायाभूत सुविधा उपलबद्धतेची पूर्तता करणे तसेच जामनेर तालुक्यात रोजगाराभिमुख व्यवसाय निर्मितीवर भर देत जनतेला सर्वेतोपरी मदत करण्याचा माझा हेतू आहे. एक विकसित तालुका म्हणून जामनेर शहराला ओळख मिळावी अशी इच्छा बाळगून मी कायम प्रयत्न करत आलो आहे आणि यापुढेही करत राहील.

‘परिवर्तन घडवायचे असेल तर त्याची सुरुवात ही आपल्या घरातूनचं व्हायला हवी त्यानंतर उत्तरोत्तर पुढे जायला हवे’ असे मला मनापासून वाटते. त्यासाठी मला माझे कुटुंब, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, मित्रपरिवार व इतर आप्तेष्टांची तसेच आपणा सर्वांची साथ देखील तितकीच महत्वाची वाटते. आपल्या सर्वांच्या सोबतीने एक सर्वांगीण विकसित जामनेर मॉडेल आपल्याला उभे करायचे आहे. यासाठी योग्य ते पाठबळ, सहकार्य पक्ष व जनतेकडून मला नक्कीच मिळेल असा विश्वास वाटतो.



**डॉ.प्रशांत भिमराव पाटील**

जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा ध्यास

# राजकीय भेटीगाठी – काही क्षणचित्रे

















डॉ.प्रशांत भिमराव
पाटील

**जामनेरचा सर्वांगीण विकास**
**हाच आमचा ध्यास**










**डॉ.प्रशांत भिमराव पाटील**

जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा ध्यास

# उल्लेखनीय कार्ये

***शेतकऱ्यांना ठिबक सिंचनावरील दहा वर्षांनंतर मिळणारे अनुदान रद्द करून सात वर्षांनंतर ते मिळावे यासाठी मी स्वतः मा. श्री. रोहित पवार यांच्या माध्यमातून पाठपुरावा केला व हे कार्य यशस्वी करून दाखवले. या निर्णयामुळे शेतकऱ्यांनी कामाचे प्रचंड कौतुक केले...***





आ.रोहित पवार यांच्या पाठपुराव्यामुळेच

ठिबक तुषार संच अनुदान लाभाचा कालावधी ७ वर्षांचाच राहील- राज्य शासनाने दिली मंजूरी

***जामनेर शहर व विधानसभा क्षेत्रातील खेड्या- पाड्यातील जवळपास 2500 पेक्षा जास्त कर्करोग, हृदयविकार, किडनी ट्रान्सप्लांट, मणक्याचे ऑपरेशन, मोतिबिंदु यासारख्या अतिशय गंभीर तसेच खर्चिक आजारांच्या रुग्णांना माझ्या माध्यमातून आर्थिक लाभ मिळवून देत त्यांना आजारातून बरे केले.***







डॉ.प्रशांत भिमराव
पाटील

जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा ध्यास

## संकट, आपत्ती समयी डॉक्टर या नात्याने सामाजिक कार्यात मोलाचे योगदान

1. कोल्हापूर- सांगली महापूर परिस्थिती दरम्यान आठ दिवस पूरग्रस्त नागरिकांना डॉक्टर या नात्याने मोफत वैद्यकीय सेवा दिली तसेच पूरग्रस्तांसाठी औषधी व जवळपास दीड लाख रुपयांची आर्थिक मदत जमा करून सुपूर्द केली.

2. कोरोना काळात जामनेर तालुक्यात मोफत मास्क व सॅनिटायझर वाटप करत गावपातळीवर प्रबोधन केले तसेच स्वतःच्या हॉस्पिटल मध्ये माफक दरात कोविड रुग्णांचा इलाज देखील केला.





*मुंबई पोलीस चालक भरती प्रक्रियेची सुधारित गुणवत्तेच्या आधारावरील यादी सादर करावी या संदर्भात मी निवेदने दिली होती. मा. आ. एकनाथ खडसे साहेबांच्या माध्यमातून पाठपुरावा करत प्रश्न मार्गी लावला.*





जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा ध्यास

## सामाजिक – राजकीय जीवनातील कार्यकृती

# • कृषी व ग्रामविकास

***अवकाळी पाऊस व वादळामुळे जामनेर तालुक्यात झालेल्या शेतीच्या नुकसानाची पाहणी करत तात्काळ नुकसानग्रस्त शेतांना भेट देत प्रशासकीय यंत्रणांना तेथील अडचणी व समस्यांसंदर्भात माहिती दिली आणि लवकरात लवकर याचा पाठपुरावा करण्यासंदर्भात निवेदन केले.***







जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा ध्यास

निमखेडी व जळांद्री परिसरात उन्हाळ्यामध्ये शेतकऱ्यांना शेतीसाठी व पिण्याच्या पाण्यासाठीच्या टंचाईचा सामना करावा लागतो. पाण्याच्या अभावी शेतामध्ये उभी असलेली केळी व टरबूज याचे खूप मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या नुकसानीचे गांभीर्य लक्षात घेत माझ्यासह अनेक शेतकऱ्यांचे शिष्टमंडळ मा. एकनाथ खडसे साहेबांना भेटले. साहेबांनी ताबडतोब वरिष्ठांना फोन करून या विषयाची दखल घेण्यास भाग पाडले व आज अखेरीस या शेतकऱ्यांना पाण्याचा लाभ मिळाला यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.





जामनेर तालुक्यातील एक व्यापारी कोरोना काळामध्ये शेतकऱ्यांचा माल घेऊन फरार झाला त्या व्यापाऱ्यास तात्काळ अटक करावी या संदर्भात राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने मी शेतकरी व कार्यकर्त्यांसह आंदोलन केले.





जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा ध्यास

# •आरोग्य

*जामनेर तालुक्यातील मोयखेडा, मोताळा, चिंचखेडा, पळसखेडा, पिंपरखेडा इत्यादी ठिकाणच्या अनेक गरीब रुग्णांची कर्करोगासारख्या अत्यंत गंभीर आजारावर उपचार व्हावे यासाठी अनेक सरकारी योजनांचा लाभ मिळवून देत त्यांना मी मदत मिळवून दिली. रुग्णांच्या भेटीप्रसंगीची काही छायाचित्रे.*












**जामनेरचा सर्वांगीण विकास हाच आमचा ध्यास**

***जामनेर तालुक्यात विविध कार्यक्रमांचे औचित्य साधून आरोग्यविषयक भव्य रक्तदान शिबीर, प्राथमिक तपासणी, वान आरोग्याचे, वॉक फॉर हेल्थ, मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर, हृदयरोग शस्त्रक्रिया शिबीर, मधुमेह रुग्णांसाठी मोफत तपासणी इत्यादी अनेक प्रकारची शिबिरे माझ्या माध्यमातून राबवली गेली त्याची काही क्षणचित्रे.***

















**डॉ.प्रशांत भिमराव पाटील**

जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा ध्यास

*गोंडखेड येथील गरीब रुग्णाचे मांडीचे हाड फ्रॅक्चर झाल्यानंतर त्याच्यावर यशस्वी उपचार करून दिले.*



लोणी येथील रुग्णाच्या गुडघ्याची यशस्वी शस्त्रक्रिया करून सुखरूप घरी आल्यावर सदिच्छा भेट दिली.



*जामनेर येथील कुऱ्हाड ठिकाणच्या रुग्णाच्या पायामध्ये झालेल्या रक्तांच्या गाठीचे ऑपरेशन मोफत करून दिले याप्रसंगी मी सदिच्छा भेट दिली.*



*राजनी येथे घेतलेल्या शिबिरात हृदय रोगाचे जे रुग्ण आढळले त्यांची मी यशस्वी शस्त्रक्रिया करून दिल्यानंतर सदिच्छा भेट घेतली.*





जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा ध्यास

*वाकी येथील गरीब रुग्णाचे मोफत मणक्याचे ऑपरेशन करून दिले.*



*राजनी येथील आजीबाईचे ऑपरेशन झाले त्यांची विचारपूस करताना.*



*मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया केलेल्या पेशंटला हॉस्पिटलमध्ये दिली भेट.*



*मोफत हृदयाची शस्त्रक्रिया करून दिल्यानंतर रुग्णाची हॉस्पिटलमध्ये घेतली भेट.*





डॉ.प्रशांत भिमराव
पाटील

**जामनेरचा सर्वांगीण विकास**
**हाच आमचा ध्यास**



माझ्या माध्यमातून ॲडमिट असलेल्या जामनेर मतदारसंघातील रुग्णांच्या समस्या व त्यांच्या उपचारासंदर्भातील अडचणीच्या निमित्ताने माझी जबाबदारी म्हणून रुग्णांच्या भेटीसाठी गेलो.

जे जे हॉस्पिटल, मुंबई येथे तालुक्यातील माझ्यामार्फत ॲडमिट असलेल्या रुग्णांची घेतली भेट





जागतिक दिव्यांग दिनानिमित्ताने तालुक्यातील काही दिव्यांग बांधवांना मी जळगाव जिल्हा रुग्णालयामध्ये तपासणीसाठी आणले.





जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा ध्यास

*तीघरा येथील राष्ट्रवादी युवक काँग्रेसचा पदाधिकारी रमाकांत पाटील वय 24 याच्या दोन्ही किडनी निकामी झाल्या. त्याच्या शस्त्रक्रियेसाठी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचा तालुका अध्यक्ष या नात्याने मी स्वतः शासन स्तरावर पाठपुरावा करून 2.25 लाख रुपयांची रक्कम उभी केली त्यामुळे त्याचे किडनी प्रत्यारोपण यशस्वी झाले असून तो नव्या जोमाने कामाला लागला आहे.*





*राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या माध्यमातून मी धालसिंगी येथील दिपाली गाढवे वय 30 या महिलेला किडनी ट्रान्सप्लांटसाठी 4.50 लाख रुपयांची मदत मिळवून दिली. रुग्णाच्या तब्येतीची चौकशी करतांनाचे क्षणचित्र .*



*हाय-वे वरून जात असतांना रस्त्यावरील अपघातात जखमी झालेल्या महिलेला तात्काळ स्वतःच्या गाडीमध्ये हॉस्पिटलमध्ये घेऊन जात तिला जीवनदान मिळवून दिले.*





जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा ध्यास

# • युवा, महिला व रोजगार

*जागतिक मधु-मक्षिका दिनाच्या निमित्ताने 'मधमाशी आणि निसर्ग याचे महत्त्व' तसेच मधुमक्षिका पालन हा शेतीला असलेला एक पूरक व्यवसाय असल्याचे सांगत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याची मला संधी मिळाली.*




*शेतीला पूरक व्यवसाय म्हणून शेतामधेच थोड्या क्षेत्रात ऊस पेरून त्याच ठिकाणी ताज्या उसाची रसवंती उघडणाऱ्या शेतकऱ्याच्या रसवंतीला भेट देत तरुणांनी व्यवसायाकडे वळावे हा संदेश माझ्या माध्यमातून दिला.*






डॉ.प्रशांत भिमराव
पाटील

जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा ध्यास

जळांद्री येथील तरुण शेतकरी अतुल उबाळे यांनी अतिशय कमी क्षेत्रामध्ये मिरचीचे विक्रमी उत्पादन घेतले, त्याचबरोबर जमिनीचे सुयोग्य नियोजन या माध्यमातून वेगवेगळे पिके घेत तरुण शेतकऱ्यांना आदर्श घालून दिला यानिमित्ताने मी त्याला पुढील वाटचालीसाठी सदिच्छा दिल्या.



सुट्टी मध्ये बागवान नावाचा तरुण शेतकऱ्यांच्या शेतातील चिकू रस्त्यावर विक्री करत असताना त्याच्याकडून त्याच्या व्यवसायाची माहिती जाणून घेतली व तरुणांनी व्यवसायाकडे वळावे असा संदेश दिला.



कृषी व्यवसायाला संलग्न पशु व्यवसाय संदर्भात व पशुंना लागणाऱ्या खाद्याच्या संदर्भातील व्यवसायाची सुरुवात चिंचखेडा येथील तरुणाने केली . त्या व्यवसायाच्या उद्घाटन प्रसंगी तरुणांना भेट देऊन प्रोत्साहन दिले.





**जामनेरचा सर्वांगीण विकास हाच आमचा घ्यास**

*जमणासारख्या तालुक्यात देखील अंजिराची शेती करता येते त्यामुळे तरुण शेतकऱ्यांनी अशा प्रकारच्या पिकांकडे वळावे असा संदेश देत अंजीर उत्पादक शेतकऱ्यांच्या शेताला दिली भेट.*







*गोंडखेल गावातील तरुण युवकाने सोनाई डेरी वर आधारित स्वतःची डेरी चालू करून नवीन उद्योग उभा केला ह्या प्रसंगी तरुणांना मार्गदर्शक म्हणून युवक अध्यक्ष या नात्याने भेट दिली.*



*जामनेर तालुक्यातील एकुलती गावातील युवकाने हॉटेलच्या माध्यमातून नवीन व्यवसायाची सुरुवात केली तालुका युवक अध्यक्ष नात्याने त्या हॉटेलचे उद्घाटन माझ्या हस्ते करण्यात आले.*





जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा ध्यास

*जामनेर तालुक्यातील लिहे दिगर तांडा या ठिकाणी डोंगराळ जमिनीवर ब्रोकोली चे उत्पादन घेणारा आधुनिक युवा शेतकरी वसंत चव्हाण यांच्या शेताला भेट दिली व तरुणांनी आधुनिक पद्धतीने शेती करावी यासंबंधीचा संदेश राष्ट्रवादी युवक काँग्रेसचा तालुकाध्यक्ष या नात्याने दिला.*





*तालुक्यातील तरुणाने चालू केलेल्या व्यवसायाचे उद्घाटन करताना.*









जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा घ्यास



*तालुक्यातील युवकाने सुरू केलेल्या नवीन व्यवसायाचे उद्घाटन  करत त्याला भविष्यातील वाटचाली साठी सदिच्छा दिल्या .*




*तालुक्यातील तरुण युवकाने गोल्ड व सिल्वर हाऊसचा चालू केलेल्या व्यवसायाच्या  उद्घाटन  समारंभाला हजेरी लावली.*



जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा घ्यास

*तालुका युवक अध्यक्ष या नात्याने महिला व्यावसायिकांच्या कार्यक्रमाचे उद्घाटन मी केले. याप्रसंगी प्रथमच महिला उद्योग, महिला रणरागिणी, महिला समाजसेविका, राजकारणातील महिलांचा पुढाकार यासारख्या असंख्य मुद्यांवर महिलांशी संवाद साधत समाजात प्रबोधन निर्माण करण्याची संधी मिळाली.*




*मकर संक्रांती निमित्ताने महिलांसाठी ''वान आरोग्याच'' हा कार्यक्रम राष्ट्रवादी महिला व डॉक्टर सेलच्या वतीने आयोजित करण्यात आला. यामाध्यमातून स्त्रियांची मोफत आरोग्य तपासणी करत त्यांना यासंदर्भात जागरूक करतांनाची छायाचित्रे.*







डॉ.प्रशांत भिमराव
पाटील

जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा ध्यास

## • उपोषण, आंदोलन, निषेध व मोर्चे

***महापुरुषांचा अवमान करणाऱ्या शिंदे- फडणवीस सरकारमधील वाचाळ मंत्री गणांचा राष्ट्रवादी युवक काँग्रेस व महाविकास आघाडीच्या वतीने.***






***ग्रामविकास व क्रीडा मंत्री गिरीश महाजन यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा एकेरी उल्लेख केल्याचा निषेध म्हणून जामनेर मध्ये मंत्री गिरीश महाजन यांच्या पुतळ्याचे महाविकास आघाडी कडून दहन करण्यात आले.***







जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा घ्यास

***महागाई विरोधात राज्य व केंद्र सरकारचा निषेध म्हणून ''50 खोके महागाई ओके'' असे अनोखे आंदोलन राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने करण्यात आले याप्रसंगी अनेक कार्यकर्त्या समवेत पत्रकारांशी  मी संवाद  साधला.***


















डॉ.प्रशांत भिमराव
पाटील

**जामनेरचा सर्वांगीण विकास**
**हाच आमचा ध्यास**

*महाराष्ट्रातील कंपन्या दुसरया राज्यात पळवून महाराष्ट्रातील तरुणांना बेरोजगार करणाऱ्या सरकारचा निषेध म्हणून माझ्या माध्यमातून निवेदने देण्यात आली.*





*भारत मुक्ती मोर्चा च्या माध्यमातून ईव्हीएम बंद करण्यासंदर्भात राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस या राजकीय संघटनेचा पदाधिकारी यांना त्यांनी एक दिवसीय उपोषणात भाग घेतला.*



*वाकोद ग्रामपंचायतच्या समस्यांच्या संदर्भात ग्राम विकास खात्याच्या विरोधात पंचायत समिती समोर उपोषण.*





**डॉ.प्रशांत भिमराव पाटील**

जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा ध्यास

*'ईव्हीएम हटाव देश बचाओ' या बहुजन क्रांती मोर्चाच्या व्यासपीठावरून संबोधित करताना.*



*जिल्हा दूध संघाच्या कथित भ्रष्टाचार प्रकरणी पोलीस स्टेशन समोर एकनाथराव खडसे साहेबांसोबत मी ठिय्या आंदोलन केले.*



*राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या माध्यमातून 1 एप्रिल, 2023 रोजी ''एप्रिल फुल म्हणजे मोदी डे'' साजरा करून मोदींनी आतापर्यंत दिलेल्या फसव्या आश्वासनांचा मी कार्यकर्त्यांसह निषेध व्यक्त केला.*






डॉ.प्रशांत भिमराव
पाटील

जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा ध्यास

*ठिबक सिंचनाचा प्रश्न, नुकसानभरपाई, शेतमालाला हमीभाव यासारख्या शेतकऱ्यांच्या अनेक ज्वलंत प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी, शेती व शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी मी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, जामनेरतर्फे एक दिवसीय लाक्षणिक उपोषण केले.*









*जामनेर पंचायत समितीच्या भोंगळ कारभारा संदर्भात राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने एक आठवड्याचे उपोषण करण्यात आले यावेळी राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह मी स्वतः हा.*





डॉ.प्रशांत भिमराव
पाटील

जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा ध्यास

# •इतर

*'गाव तेथे राष्ट्रवादी' कार्यक्रम घेत असताना वेगवेगळ्या ठिकाणी समाजसेवेच्या माध्यमातून लाभ झालेल्या गावकऱ्यांच्या वतीने सत्कार स्वीकारतांना.*





*महाबळेश्वर येथे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे अधिवेशन सुरु असताना शरदचंद्रजी पवार साहेब यांच्यासमोर राज्यामध्ये 'शरद युवा यात्रेचे' आयोजन करण्यात यावे असे मत मी व्यक्त केले.*



*डॉक्टर सेल तालुका अध्यक्ष जामनेर या नात्याने टाकळी या गावामध्ये महात्मा ज्योतिबा फुले जयंती निमित्ताने जनतेला संबोधित करतांनाचे क्षण.*






डॉ.प्रशांत भिमराव
पाटील

**जामनेरचा सर्वांगीण विकास**
**हाच आमचा घ्यास**

***राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने पक्षाचे विचार पसरवण्यासाठी 'गाव तिथे शाखा' हा कार्यक्रम राबवला. त्यानिमित्ताने रोज चार गावांना भेटी देण्यात आल्या व याप्रसंगी गाव पातळीवरील 14 शाखांचे उद्घाटन एकाच दिवशी करण्यात आले. त्या कार्यक्रमाचे काही छायाचित्रे.***










**जामनेरचा सर्वांगीण विकास**
**हाच आमचा ध्यास**

***समरोद या गावात राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या शाखेच्या उद्घाटनाचा कार्यक्रम पार पडला. त्याचबरोबर गाव फेरी व राष्ट्रवादी युवा संवाद कार्यक्रम देखील घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व ज्येष्ठ नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते व सर्व फ्रंटल सेलचे अध्यक्ष उपस्थित होते. राजकरण व समाजकारणाचा माध्यमातुन समाजाची कशी प्रगती साधली जाऊ शकते यासारख्या असंख्य मुद्यांवर मी प्रकाश  टाकत मार्गदर्शन केले.***





***राष्ट्रवादी काँग्रेस डॉक्टर सेल, जामनेर तालुकाध्यक्ष असताना 2019 च्या विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पक्षाच्या प्रचार-प्रसारासाठी गावोगावी जाऊन मी कॉर्नर  सभा  घेतल्या.***









**डॉ.प्रशांत भिमराव**
**पाटील**

**जामनेरचा सर्वांगीण विकास हाच आमचा ध्यास**

***2019 विधानसभा निवडणुकीच्या प्रचार- प्रसार करण्यासाठी जामनेरमध्ये आलेले राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सन्माननीय जयंतराव पाटील साहेब तसेच श्री. अमोल मिटकरी या मान्यवरांनी माझ्या घरी जेवणाचा आस्वाद घेतला.***





***2019 विधानसभा निवडणुकीच्या अगोदर सन्माननीय शरदचंद्रजी पवार साहेब त्याचबरोबर सुप्रियाताई सुळे यांच्यासोबत मला संवाद साधण्याची संधी मिळाली त्या क्षणाची काही छायाचित्रे.***






जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा घ्यास

*2019 महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पूर्वी गट वाईज कार्यकर्ता मेळाव्याला संबोधित करताना.*





*गाव पातळीवर जाऊन सर्वसामान्य लोकांना शासकीय योजना, मानवी हक्क व अधिकार यासंदर्भात  माहिती देत जनजागृती केली.*








डॉ.प्रशांत भिमराव
पाटील

जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा ध्यास

***जामनेर तालुक्यातील चिंचखेडा येथे राजकीय व सामाजिक क्षेत्रात काम करत असताना कुठल्याही प्रकारचा भेदाभेद न पाळता जनसेवा हीच ईश्वरसेवा आहे असा सामाजिक संदेश देत जनतेला संबोधित केले.***





***करमाड येथे शिवजयंतीच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने तेथील शिवभक्तांना शिवरायांच्या विचारांप्रती संबोधित करतानाचे क्षण.***





डॉ.प्रशांत भिमराव
पाटील

**जामनेरचा सर्वांगीण विकास**
**हाच आमचा ध्यास**

*नेरी येथील एका शैक्षणिक संकुलामध्ये संविधान दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना संविधानाविषयी जागृत करत लोकशाही मूल्यांचे महत्व पटवून देतांना संविधान प्रचारक ऋषिकेश पवार यांच्यासमवेत.*




*टाकळी गावातील एका युवकाने गावातील विद्यार्थ्यांसाठी इंग्लिश मीडियमचे कोचिंग क्लासेस सुरू केले. ग्रामीण भागातील त्याचे हे कार्य निश्चितच अभिमानास्पद आहे. क्लासेसच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना संबोधित करतांना*






**डॉ.प्रशांत भिमराव**
**पाटील**

जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा ध्यास

*विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जंतीनिमित्त वेगवेगळया ठिकाणी संबोधित करण्याची संधी मला मिळाली. कोट्यावधी जनतेला समतेचा प्रकाश दाखवणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशाची संविधान पत्रिका या देशाच्या नागरिकांच्या नावे केलेली आहे. त्यामूळे भारत देशाचे तरुण मतदार म्हणून या देशाप्रती आपली स्वतःची राजकीय भूमिका असली पाहिजे. तसेच पवित्र ग्रंथ संविधानाला डोळ्यासमोर ठेवून आस्थेच्या प्रश्नांपेक्षा आपल्या अस्तित्वाच्या प्रश्नांकडे आपण लक्ष दिलं पाहिजे यासारख्या असंख्य मुद्द्यांवर जनतेशी संवाद साधत माणूस म्हणून जगण्याचा अधिकार देणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर तसेच इतर महापुरुषांचे अपूर्ण राहिलेले काम आपल्याला पूर्ण करायचे आहे असे आवाहन यानिमित्त मी तरुणांना केले.*













डॉ.प्रशांत भिमराव
पाटील

जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा घ्यास

*एम.एस.यु.आय च्या कार्यक्रमाच्या निमित्ताने कॉलेजच्या विद्यार्थ्यांना राजकारण या विषयावर संबोधित करताना.*





*श्री. अमोल देशमुख यांच्या माध्यमातून आयोजित पोलीस प्रशिक्षण शिबिरात 37 मुलांची महाराष्ट्र पोलीस सेवेसाठी निवड झाली यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असतांनाची क्षणचित्रे.*







जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा ध्यास

*मांडवा गावातील एका मुलीच्या विवाह सोहळ्याच्या निमित्ताने अभिनव उपक्रम म्हणून राबवण्यात आलेल्या रक्तदान शिबिराचे माझ्याहस्ते उद्घाटन झाले व सर्वांना संबोधित करण्याची संधी मिळाली.*



*जामनेर येथील राहुल थाटे याची भारतीय रेल्वेमध्ये नियुक्ती झाल्या निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेस जामनेर तालुका युवक अध्यक्ष या नात्याने त्याचा सत्कार केला.*



*मा. श्री. प्रदीप दादा साळुंखे यांची माझ्या घरी धावती भेट.*




*तालुका युवक अध्यक्ष या नात्याने प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील साहेब दौऱ्यावर असताना त्यांचे स्वागत केले.*





डॉ.प्रशांत भिमराव
पाटील

जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा ध्यास



मागासवर्गीय समाजातून अतिशय कठीण परिस्थितीत मेहनत करून भारतीय सैन्य दलामध्ये नियुक्ती झाल्याबद्दल विद्यार्थ्यांचा सत्कार करत पुढील वाटचालीसाठी त्याला सदिच्छा दिल्या.



वाकी गावातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची ऑस्ट्रेलिया येथे शिक्षणासाठी निवड झाल्याबद्दल तालुका युवक अध्यक्ष या नात्याने त्याचा सत्कार केला.



डॉ.प्रशांत भिमराव
पाटील

**जामनेरचा सर्वांगीण विकास**
**हाच आमचा ध्यास**

सृजन संवाद कार्यक्रमाच्या
निमित्ताने सन्माननीय रोहित
दादा पवार यांच्यासमवेत.




गाव भेटी दरम्यान तरुणांशी
साधला संवाद.



महाबळेश्वर येथील राष्ट्रवादी युवक
काँग्रेसच्या अधिवेशनावेळी शशिकांत शिंदे
साहेबांशी संवाद साधतांना.



राष्ट्रवादी युवक काँग्रेसचा धडाडीचा गटनेता
विशाल भाऊ फरपट यांचा
वाढदिवस साजरा करताना.





**डॉ.प्रशांत भिमराव**
**पाटील**

**जामनेरचा सर्वांगीण विकास**
**हाच आमचा ध्यास**

*तालुका युवक अध्यक्ष म्हणून*
*झालेली  नेमणूक.*




*तालुका युवक अध्यक्ष या नात्याने तालुक्यातील*
*वेगवेगळ्या समस्यांवर केला पाठपुरावा.*



*सन्माननीय एकनाथजी खडसे साहेब विधान*
*परिषदेवर आमदार म्हणून निवडून आल्यानंतर नंतर*
*मुंबई येथे कार्यकर्त्यांसह जल्लोष करताना.*



*सकल मराठा समाज संघटनेच्या वधुवर परिचय*
*कार्यक्रमाप्रसंगी  सर्वपक्षीय व सर्व संघटनांच्या*
*वतीने तसेच समाजाचा एक घटक या नात्याने*
*मी माझी भूमिका मांडली.*





**डॉ.प्रशांत भिमराव**
**पाटील**

जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा ध्यास

तालुक्यातील एका विद्यार्थ्याचे कॉलेजमध्ये अडकलेले पैसे त्याला मिळवून देण्यासाठी मी सहकार्य केले.




मा. श्री. रोहित दादा पवार यांच्या स्वराज्य ध्वज यात्रेचे जामनेर येथे आगमन झाले असता माझी आई व इतर वृद्ध महिला गावकरयानी यात्रेचे स्वागत केले.




नेरी (ता. जामनेर, जि. जळगाव) येथील एका शैक्षणिक संकुलात आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमाच्या उद्घाटनाच्या निमित्ताने विद्यार्थी व शिक्षकांना संबोधित केले.




जागतिक दिव्यांग दिनानिमित्ताने अक्षय भाऊ बोहरा तसेच शहराध्यक्ष पप्पू पाटील यांच्यासह दिव्यांग व्यक्तींना गरजेच्या वस्तू भेट दिल्या.





डॉ.प्रशांत भिमराव
पाटील

जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा ध्यास

*महाविकास आघाडीचे सरकार असतांना तालुका युवक अध्यक्ष या नात्याने तालुक्यातील समस्या राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील साहेबांकडे घेऊन गेलो.*





दिव्य मराठी चाळीसगाव 02-06-2023

**पोखरा योजना, डीबीटी अंतर्गत राष्ट्रीय सूक्ष्म सिंचनाची योजना बंद झाल्याने शेतकऱ्यांना बसतोय आर्थिक भुर्दंड**

*DBT अंतर्गत राष्ट्रीय सूक्ष्म सिंचन योजनेचा लाभ 'ड्रॉ' न निघाल्याने शेतकऱ्यांना मिळत नाही. या प्रश्नासंदर्भात कृतिशील आमदार रोहित दादा पवार यांच्याकडे शेतकऱ्यांचा हा प्रश्न लवकरात लवकर सुटावा यासाठी राष्ट्रवादी युवक काँग्रेस, जामनेरच्या वतीने मी निवेदन दिले.*



जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा ध्यास

’मी सहा सहा महिने मतदार संघात येत नाही तरी लोक मला निवडून देतात’’ या गिरीश महाजन यांच्या वक्तव्यावर राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या माध्यमातून पत्रकार परिषद घेऊन मतदार संघात फिरून तालुक्याची झालेली दुरावस्था पाहण्याचे त्यांना आव्हान केले.





जामनेर तालुक्यातील लिहे दिगर तांडा येथील आदिवासी शाळेला माझ्या माध्यमातून सन्माननीय माजी आमदार सुधीरजी तांबे साहेब यांच्या निधीतून पाठपुरावा करत संगणकाचा संच शाळेला मिळवून दिला.

तालुक्यातील विविध लोकांच्या समस्या घेऊन एकनाथ खडसे साहेबांकडे मांडला जनता दरबार.







डॉ.प्रशांत भिमराव
पाटील

जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा ध्यास

*राजकीय जीवनात काम करत असताना सामाजिक कार्याच्या माध्यमातून तालुक्यातील ज्या गोरगरीब रुग्णांसाठी मुंबई, पुणे, औरंगाबाद ई. ठिकाणच्या तज्ञ डॉक्टरांची नेहेमीच मदत लाभत असते. अशा सर्वच सहकारी तज्ञ डॉक्टरांचे मी प्रत्यक्ष आभार मानले.*







*मा. श्री. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्ताने जामनेर येथे राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या माध्यमातून 'व्हर्च्युअल रॅलीचे' आयोजन करण्यात आले होते. त्यावेळेची उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.*






डॉ.प्रशांत भिमराव
पाटील

जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा ध्यास

*लग्न समारंभ प्रसंगी अनेक ठिकाणी प्रमुख अतिथी म्हणून दिली भेट.*





*राष्ट्रवादी युवक काँग्रेसचा तालुकाध्यक्ष या नात्याने मी जामनेर विधानसभा मतदारसंघातल्या विविध समस्या व अडचणीविषयी मुंबई येथे विविध मंत्र्यांकडे जात चर्चा करत निवेदने दिली व शासनदरबारी मतदारसंघाच्या वतीने समस्या दूर करण्याचे आवाहन केले.*

















जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा ध्यास

# • वृत्तपत्र माध्यमांनी घेतली कार्याची दखल

आ.रोहित पवार यांच्या पाठपुराव्यामुळेच

## ठिबक तुषार संच अनुदान लाभाचा कालावधी ७ वर्षाचाच राहील- राज्य शासनाने दिली मंजूरी



## फडणवीस सरकारची दहा वर्ष ठिंबकची अट ठाकरे सरकारकडून शिथिल

### आ.रोहित पवार यांच्या प्रयत्नांमुळे शेतकऱ्यांना दिलासा

पुण्य प्रताप

आ.रोहित पवार यांच्या पाठपुराव्यामुळेच

ठिबक तुषार संच अनुदान लाभाचा कालावधी ७ वर्षाचाच राहील- राज्य शासनाने दिली मंजूरी





## जामनेरचा सर्वांगीण विकास हाच आमचा ध्यास

# जामनेर पंचायत समितीत ठाण मांडून बसलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या करा

अनागोंदी कारभाराची ही तक्रार; कारवाई होईपर्यंत सामूहिक उपोषण



जामनेर पंचायत समितीसमोर उपोषण करताना राजेंद्र पाटील, प्रदीप लोढा, व्ही. पी. पाटील, किशोर पाटील.

प्रतिनिधी । जामनेर

### राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांची होती उपस्थिती

---

लोकमत समाचार

# जांच तंत्र के अनुचित उपयोग पर अंकुश की मांग



जलगांव जिले के जामनेर में सोमवार को स्थानीय कांग्रेस इकाई की ओर से अपनी समस्या को लेकर तहसील प्रशासन को ज्ञापन सौंपा गया।

**जामनेर.** राष्ट्रवादी कांग्रेस के प्रदेशाध्यक्ष विधायक जयंत पाटील पर ईडी की ओर से की जा रही कार्रवाई के खिलाफ स्थानीय पदाधिकारियों ने सोमवार को तहसील प्रशासन को ज्ञापन सौंपकर जांच तंत्र के अनुचित उपयोग पर प्रतिबंध लगाने की मांग की है. ज्ञापन में उल्लेख किया गया कि, पार्टी के प्रदेशाध्यक्ष विधायक जयंत पाटील को ईडी की ओर से बेवजह परेशान किया जा रहा है. इसके कारण जांच तंत्र का उपयोग देश की सुरक्षा के बजाए राजकीय हो रहा है, जिसके कारण सामान्य व्यक्ति का जांच तंत्र से विश्वास उठ रहा है. ज्ञापन पर राष्ट्रवादी युवक कांग्रेस तहसील अध्यक्ष डॉ प्रशांत पाटील, सचिन बोरसे, नरेंद्र जंजाल, पूर्व नगरसेवक माधव चव्हाण, मोहन चौधरी, संतोष झाल्टे, संदीप साबले, उल्हास नेमाड़े, सुनील मराठे, राहुल चव्हाण, प्रवीण कुमार, किशोर पाटील, अरविंद चितोड़िया, नरेंद्र धुमाल, जीवन राठौड़ सहित कार्यकर्ता, पदाधिकारी उपस्थित थे.

Apna Samachar
Page No. 4 May 24, 2023
Powered by: erelego.com

---

# पुण्य प्रताप

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सर्वेसर्वा मा.शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त

## जामनेर येथे walk for helth हा कार्यक्रम संजयदादा गरुड यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न





जामनेर/प्रतिनिधी

---



जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा घ्यास

लोकमत

# गुरुवार ठरला आंदोलनाचा दिवस!

## वाकोद सरपंचांचे जामनेरात, तावसे बु. येथील ग्रामस्थांचे चोपड्यात उपोषण

लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव : जिल्ह्यात गुरुवारचा दिवस हा आंदोलनाचा दिवस ठरला. जामनेर तालुक्यातील वाकोद सरपंचांनी जामनेरात तर चोपडा तालुक्यातील तावसे बु. येथील ग्रामस्थाने चोपडा येथे उपोषण करून आंदोलन केले.

**नेरी येथील ग्रामस्थांचे बीडीओंना निवेदन**

जामनेर : नेरी बुद्रुक (ता. जामनेर) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगरमधील रहिवाशांनी गुरुवारी गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन दिले. शासनाने घरकुल मंजूर केले असून घरकुलासाठी जागा नसल्याने ग्रामपंचायतीच्या मालकीची शासकीय जागा उपलब्ध करून देण्याची मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदन देताना रिपाइंचे जिल्हा युवक अध्यक्ष भगवान सोनवणे, जयमाला इंगळे, प्रतिभा पगारे, रेखा जाधव, अनिता रोकडे, आशा जाधव, हबिबाजी शेख जाकीर, इंदुबाई रूपकाळ, जकीय शेख मेहबूब तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### तावसे बु. येथील अतिक्रमणविरोधात उपोषण

१ चोपडा : तावसे बु. येथील विद्यमान सरपंचांच्या पतीने गावात सार्वजनिक जागेवरील अतिक्रमण तत्काळ काढून घेण्याची कार्यवाही न केल्यामुळे ग्रामस्थ संतोष अमृत बाविस्कर हे उपोषणास बसले आहेत.

२ तावसे बु. येथील सरपंच कमलबाई जीवनलाल चौधरी यांचे पती जीवनलाल विश्राम चौधरी यांनी गावातील मुख्य रस्त्यावर व त्यालगतच्या जागेवर अतिक्रमण करून पत्राशेड उभे केले आहे. त्यांनी अंदाजे २८० स्क्वे. फूटवर अतिक्रमण केले आहे. त्यामुळे रस्त्याने येणाऱ्या-जाणाऱ्यांना रहदारीस अडथळा निर्माण होतो. तरी त्याबाबत त्यांना समजावले असता त्यांनी धमकावले व त्यांनी केलेले सार्वजनिक रस्ता व जागेवर केलेले अतिक्रमण हटवले नाही. ग्रामसेवक, गटविकास अधिकारी, तहसीलदार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी यांना अर्ज दिले आहेत. परंतु, फक्त चौकशी झाली. मात्र कोणतीही कारवाई करण्यात आली नाही अथवा अतिक्रमण हटविण्यात आले नाही. त्याविरोधात हे उपोषण करण्यात आले.

३ तर न्याय मिळाला नाही, तर मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय येथे बेमुदत उपोषणाला बसण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. सायंकाळी जितेंद्र पाटील, हेमकांत गायकवाड, बापू कोळी, समाधान कोळी आदींनी उसाचा रस पाजून उपोषण सोडविले.

### सरपंच, सदस्यांचे जामनेरला उपोषण

- जामनेर : वाकोद (ता. जामनेर) ग्रामपंचायतीने ठरावासह मंजूर केलेली प्रधानमंत्री आवास योजनेची 'ड' यादी व रमाई आवास योजनेच्या यादीतील पात्र लाभार्थ्यांच्या यादीत ढेडफाड करून परस्पर फेरफार केल्याचा आरोप वाकोद येथील सरपंच, उपसरपंच व पदाधिकाऱ्यांनी केला आहे. पंचायत समितीच्या भोंगळ कारभारविरुद्ध गुरुवारी उपोषणास सुरुवात केली.
- गटविकास अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, घरकुल यादीत फेरफार केल्याबाबत चौकशी व्हावी व पात्र लाभार्थ्यांचा यादीत समावेश करावा. वैयक्तिक शौचालय योजनेत पात्र लाभार्थ्यांची यादी मंजूर करून अनुदान जमा करावे. दलित वस्ती सुधार योजनेच्या ५५ लाखाच्या कामांचा प्रस्ताव पाठवूनही मंजूर न करता रद्द केला गेला. ज्या कामांचा प्रस्ताव पाठविला नाही, तो मंजूर करण्यात आला. याचीही चौकशी करावी, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

### वाकोद सरपंचांनी रक्ताने लिहिले मुख्यमंत्र्यांना पत्र

जामनेर : राजकीय हेवादेवी होत असलेली दप्तरदिरंगाई थांबवावी, अशी मागणी करणारे पत्र वाकोद येथील सरपंच सरला सपकाळे, उपसरपंच रवींद्र भगत व सदस्यांनी रक्ताने लिहिले. सरपंच, सदस्य व ग्रामस्थांनी पंचायत समितीसमोर उपोषण केले. उपोषणस्थळी लिहिलेले पत्र जिल्हाधिकारी यांच्यामार्फत पत्र मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचविले जाणार असल्याचे सांगण्यात आले.



Hello Jalgaon Gramin
Page No. 1 Dec 09, 2022
Powered by: erelego.com

पुण्यनगरी

## राष्ट्रवादी काँग्रेसचे महागाई विरोधात आंदोलन

जामनेर : राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्यावतीने महागाईच्या विरोधात आंदोलन आयोजित केले आहे तरी तालुक्यातील सर्व ज्येष्ठ श्रेष्ठ नेते मंडळी,जिल्हा परिषद व पंचायत समितीचे आजी - माजी सदस्य,नगरसेवक तसेच तालुक्यातील सर्व फ्रंटलचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी आज दि.१ गुरुवार रोजी सकाळी ११ वाजता नगरपरिषद कार्यालयासमोरील राष्ट्र माता जिजाऊ चौकात जास्तीत जास्त संख्येने हजर राहावे असे आवाहन राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष डॉ.प्रशांत पाटील,शहराध्यक्ष विनोद माळी यांनी केले आहे.

Smart Jalgaon
Page No.4 September 01, 2022

## जामनेर पं.स.च्या भोंगळ कारभाराविरोधात रा.काँ.चे बेमुदत उपोषण

### भ्रष्टाचाराची चौकशी करून नवीन ग्रामसेवक नियुक्तीची मागणी





डॉ.प्रशांत भिमराव
पाटील

## जामनेरचा सर्वांगीण विकास
## हाच आमचा घ्यास

दिव्य मराठी — चाळीसगाव 02-06-2023

### पोखरा योजना, डीबीटी अंतर्गत राष्ट्रीय सूक्ष्म सिंचनाची योजना बंद झाल्याने शेतकऱ्यांना बसतोय आर्थिक भुर्दंड

पोखरा योजना सुरू करा

### वाकोद सरपंचांनी रक्ताने लिहिले मुख्यमंत्र्यांना पत्र

जामनेर : राजकीय द्वेषापोटी होत असलेली कारवाई थांबवावी, अशी मागणी करणारे पत्र वाकोद येथील सरपंच सरला सपकाळे, उपसरपंच रवींद्र भगत व सदस्यांनी रक्ताने लिहिले. सरपंच, सदस्य व ग्रामस्थांनी पंचायत समितीसमोर उपोषण केले. उपोषणस्थळी लिहिलेले पत्र जिल्हाधिकारी यांच्यामार्फत पत्र मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचविले जाणार असल्याचे सांगण्यात आले.



## पुण्यनगरी

मंगळवार, २५ फेब्रुवारी २०२०

### फडणवीस सरकारची दहा वर्ष ठिंबकची अट ठाकरे सरकारकडून शिथिल

आ. रोहित पवार यांच्या प्रयत्नांमुळे शेतकऱ्यांना दिलासा

6:09

**Rohit Rajendra Pawar**
6 hrs · Facebook for Android

तुषार आणि ठिबक सिंचन संचासाठी देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या प्रश्नासंदर्भात पंधरा दिवसांपूर्वी मी राज्याचे कृषी आयुक्त श्री. सुहास दिवसे साहेब यांची भेट घेऊन चर्चा केली होती. त्यावेळी दिवसे साहेबांनी हा प्रश्न सोडवण्याचं आश्वासन दिलं होतं. त्यानुसार काल स्वतः कृषीमंत्री श्री. दादा जी भुसे साहेब यांनी यात लक्ष घालून हा प्रश्न सोडवला. याबद्दल महाविकास आघाडी सरकार, भुसे साहेब, दिवसे साहेब आणि कृषी विभागाचे सर्व अधिकारी यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. हे सरकार सर्वसामान्य लोकांचं म्हणणं ऐकणारं आणि त्यांचे प्रश्न सोडवणारं सरकार आहे, हे पुन्हा एकदा यानिमित्ताने स्पष्ट झालं आहे.

Fifteen days ago, I had met State Agriculture Commissioner Shri. Suhas Divase ji, to discuss with him regarding the funding... More





### जामनेर येथे राष्ट्रवादी कॉंग्रेसतर्फे विविध मागण्यांसाठी बेमुदत उपोषण

### पान १ वरुन

### फडणवीस सरकारची...

आदी उपस्थित होते. सत्ता गेल्यामुळे भाजपा आता केविलवाणापणा करीत असून चोराच्या उलट्या बोंबा म्हणत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे विधानसभा क्षेत्रप्रमुख किशोर पाटील यांनी भाजपा आज करीत असलेल्या राज्यव्यापी आंदोलनाविषयी टिकास्त्र सोडले. सोईसुविधा व बांधकाम अपूर्ण असलेल्या शहरातील बसपोर्ट घाईघाईत सुरू करण्याचे नेमके कारण काय? असा प्रश्नही त्यांनी यावेळी उपस्थित केला.



डॉ. प्रशांत भिमराव पाटील

जामनेरचा सर्वांगीण विकास
हाच आमचा ध्यास

# संपर्क :-

Facebook - **Dr, PrashantPatilJamner**
*https://www.facebook.com/Dr.PrashantPatilJamner?mibextid=ZbWKwL*

Instagram -**dr.prashantpatiljamner**
*https://instagram.com/dr.prashantpatiljamner?igshid=ZGUzMzM3NWJiOQ==*

Twitter -**dr_nycjamner**
*https://twitter.com/dr_nycjamner?t=WRqOdsqfJ-yRQ6dDq5_qSQ&s=09*

Whatsapp - **+919529474438**

Website – **drprashantpatiljamner.com**
*https://drprashantpatiljamner.com*

**संपर्क क्रमांक :- +919529474438**
**संपर्क मेल आयडी :- contact@drprashantpatiljamner.com**

